महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा

शेतकऱ्याचे नाव: हेमंत मुकुटराव जाधव
पत्ता: खेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद
फोन नं.: ८६०५३४०५५३



एमजीएम, कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्रातर्फे सन २०१६-१७ मध्ये "राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन"अंतर्गत तूर पिकाच्या समूह पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन दत्तक गाव खेडा येथे करण्यात आले होते. या पीक प्रात्यक्षिकांमध्ये श्री. हेमंत मुकुटराव जाधव यांनी एक एकर क्षेत्रावर बीडीएन ७११ या नवीन वाणाचे प्रात्यक्षिक घेतले. या वर्षी कमी पाऊस पडल्यामुळे तूर पिकात शेंगा भरत असताना जमिनीत ओलावा नसल्यामुळे पिकास एक पाणी द्यावे लागले. एक एकर क्षेत्रामध्ये त्यांना ७ क्विंटल तुरीचे उत्पन्न मिळाले. तुरीला ४५०० रुपये भाव मिळाल्यामुळे एक एकर क्षेत्र मधून त्यांना ३१५०० रुपये एकुण उत्पन्न मिळाले.




## कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य

१. बीडीएन ७११ वाणाचे बियाणे
२. गंधक
३. बीज प्रक्रिया साहित्य
४. पीक संरक्षणासाठी लागणारी कीटकनाशके
५. क्षेत्रभेटीद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र


(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)


# यशोगाथा



शेतकर्याचे नाव : कृष्णा माधवराव शिरसाठ
गाव: पिंपळगाव (वळण) ता.फुलंब्री
जि. औरंगाबाद
फोन न.:९४२३६६२१८१

श्री. कृष्णा शिरसाठ यांनी एमजीएम कृषि विज्ञान केंद्रच्य "रेशीम उत्पादक" प्रशिक्षणाचे प्रशिक्षणार्थी असून, औरंगाबाद पासून २९ किमी. अंतरावर फुलंब्री पिशोर रोडवर पिंपळगावचे रहिवासी आहेत. श्री. शिरसाठ हे पूर्वी पारंपरीक शेती व भाजीपाला दुग्ध उत्पादन या प्रकारची शेती करत. २०१६ मध्ये गावतील शेतकऱ्यांना गट तयार करून प्रशिक्षण घेऊन रेशीम शेती करण्यास प्रवृत्त केले. तसेच गटाचे नोंदणी जिल्हा रेशिम कार्यालय, औरंगाबाद येथे करण्यात आली. गात नोंदणी नंतर त्यांना संगोपनगृह मंजूर करण्यात आले व त्यांनी अगोदर स्वखर्चाने अगोदर शेडचे बांधकाम केले. त्यासठी एकूण खर्च २.५ लक्ष रुपये आला. त्या नंतर त्यांना तीन टप्प्यात पैसे मिळाले. २०१७ मध्ये एक एकर खेत्रात व्हि–१ तुतीची लागवड केली असून त्यांना त्यांच्या पत्नी पाला कापणे, पाला फिडिंग करणे व कोष काढणे या सारख्या रेशीम मिटक संगोपनाच्या कामात मदत करतात. एका वर्षात १५० अंडीपुंज कोष उत्पादनाच्या ४ बॅच घेतात. एका बॅच मध्ये १२० किलो कोशाचे उत्पन्न आले. कोषाला सरासरी ४०० रुपये भाव मिळाला. अश प्रकारे ४ बॅचच्या कोशाचे उत्पन्न १६०००० रुपये आले असून ४ बॅचसाठी १६००० रुपये खर्च आला १४४००० रुपये नाफा झाला. इतर पिकांच्या तुलनेत रेशिम उत्पादन फायदेशीर ठरले आहे. त्यमुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होऊन जीवनमान उंचावले आहे.





महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



शेतकर्याचे नाव : विजय पुंडलिकराव डकले
गाव: डोंगरगाव(कवाड) ता.फुलंब्री जि. औरंगाबाद
फोन न.:९४२३६६२१८१

श्री.विजय डकले यांनी एमजीएम कृषि विज्ञान केंद्रच्या ''रेशीम उत्पादक'' प्रशिक्षणाचे प्रशिक्षणार्थी असून, औरंगाबाद पासून ३२ किमी. अंतरावर फुलंब्री राजूर रोडवर डोंगरगावचे रहिवासी आहेत. वर्ष २००६ पासून रेशीम व्यवसाय करत होते. पण यात मुख्य समस्या कमी कोष देणारे वाण व विक्री व्यवस्था या होत्या. यातून मार्ग काढत गटाच्या माध्यमातून कोष एकत्र करून विक्री रामनगरम कर्नाटक बाजरपेठेत विक्री केली. मालास योग्य भाव मिळाल्याणे रेशीम शेती फायद्याची ठरू लागली. २०१२ मध्ये व्यावसाईक चॉकी सेंटरची सुरवात करून जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना बाल्य कीटकांचा पुरवठा केला जातो. एका बॅचमध्ये ५००० अंडीपुंज उबवून बाल्य कीटकांची विक्री केली जाते. १०० अंडीपुंज चॉकीसाठी १२०० रुपये मिळतात.तर एका बॅचमागे त्यांना ५०,००० - ६०,००० रुपया पर्यंत मासिक उत्पन्न होते. तसेच प्रौढ किटक संगोपनातून वर्षाकाठी ८ क्विंटल कोशाचे उत्पादन होऊन ३ लाख रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न होते. श्री.डकले यांच्याकडे संपूर्ण ३ एकर क्षेत्र असून सर्व क्षेत्रात तुती व्हि-१वाणाची लागवड केली आहे. यातून मिळणाऱ्या पाल्यावर ४-५ कोष उत्पादनाच्या बॅच घेतल्या जातात व चॉकी चॉकी संगोपनात हा पाला वापरला जातो. या कामात त्यांना घरातील सर्व सदस्यांचे सहकार्य मिळते.

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



शेतकऱ्याचे नाव: सुभाष सूर्यभान ठोंबरे
पत्ता: जळगावघाट ता. कन्नड
जि. औरंगाबाद
फोन नंबर:- ९५४५५८०३७४

एमजीएम, कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्रातर्फे सन २०१५-१६ मध्ये "राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन" अंतर्गत जळगावघाट या दत्तक गावांमध्ये हरभरा या पिकाचे समूह पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन रब्बी हंगामात करण्यात आले होते. या पीक प्रात्यक्षिकांमध्ये सुभाष सूर्यभान ठोंबरे या शेतकऱ्याने एक एकर क्षेत्रावर जॉकी ९२१८ या नवीन वाणाचे खरिपातील मका पिकानंतर प्रात्यक्षिक घेतले. या एक एकर क्षेत्रामधून त्यांना ४ क्विंटल हरभऱ्याचे उत्पन्न मिळाले. यावर्षी हरभऱ्याला ५००० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाल्यामुळे त्यांना या क्षेत्रामधून २०००० रुपये उत्पन्न मिळाले. या उत्पन्नातून ५० किलो बियाणे त्यांनी पुढील वर्षीच्या पेरणीसाठी ठेवले.



## कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य

१. जॉकी ९२१८ वाणाचे बियाणे
२. सूक्ष्म अन्नद्रव्य
३. बीजप्रक्रिया साहित्य
४. पीक संरक्षणासाठी लागणारी कीटकनाशके
५. प्रक्षेत्र भेटीसाठी मार्गदर्शन

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा




शेतकऱ्याचे नाव: सागर रमेश वरकड
पत्ता: खिर्डी ता. खुलताबाद,
जि. औरंगाबाद
फोन नं.:- ८८८८२१०१९१

एमजीएम कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्रातर्फे सन २०१९-२० मध्ये कौशल्य विकास मंत्रालय तर्फे गुणवत्ता बीजोत्पादक या कौशल्यावर आधारित १ महिन्याच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २० ग्रामीण युवकांनी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. यापैकी श्री. सागर रमेश वरकड या युवकानी वडिलांच्या मंदाकिनी एग्रो सर्विसेस, काटशेवरी फाटा या प्रक्रिया उद्योगाची जबाबदारी स्वीकारली. या प्रक्रिया उद्योगांमध्ये सन २०१९-२० मध्ये ५०० क्विंटल गव्हाची चाळणी व प्रतवारी केली. या प्रशिक्षणाद्वारे ज्ञान घेऊन स्वतःच्या कंपनीचे बीजोत्पादन सुरू करण्याकडे वाटचाल सुरू आहे.

कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य

१. बीजोत्पादन प्रशिक्षण
२. बीजोत्पादन क्षेत्राला भेट
३. पायाभूत बियाणे मिळण्यासाठी सहकार्य

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा

शेतकऱ्याचे नाव: मंगेश जाधव
पत्ता: खेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद
फोन नंबर: ९०२८५५५४३२



एमजीएम कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्राच्या दत्तक गावातील शेतकरी श्री. मंगेश भाऊसाहेब जाधव हे शेतामध्ये नेहमीच नवीन प्रयोग करून उत्पादन घेत असतात. सन २०१६-१७ व २०१८-१९ मध्ये त्यांनी जोड ओळ पद्धतीने कापूस पिक लागवडीचा प्रयोग केला. त्यामध्ये त्यांनी ५ X १ X ७ फूट याप्रमाणे कापूस पिकाची लागवड केली. या अंतरावर कापसाची लागवड केल्यामुळे सर्व कापसाच्या झाडांना सूर्यप्रकाश भरपूर मिळतो व त्यामुळे खालील पक्व बोंडे काळी पडत नाही तसेच फवारणी व तण नियंत्रणही या पद्धतीत सुलभ व कमी खर्चात होते. या जोड पद्धतीमधून त्यांनी एकरी १८ क्विंटल कापसाचे विक्रमी उत्पादन घेतले आहे.



कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य

१. लागवड अंतराचे शेतकऱ्याचे शेतावर प्रयोग
२. प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन
३. प्रक्षेत्र भेटीद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन

महात्मा गांधी मिशन
# कृषि विज्ञान केंद्र
(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



शेतकऱ्याचे नाव: अशोक ज्ञानेश्वर ठोकळ
पत्ता:- आठेगाव ता. कन्नड
जि. औरंगाबाद
फोन नं.:- ९४०४३४८७३४

एमजीएम कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्रातर्फे सन २०१७-१८ मध्ये "राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन" अंतर्गत तूर पिकाच्या समूह पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन दत्तक गाव आठेगाव येथे करण्यात आले होते. या पीक प्रात्यक्षिकांमध्ये श्री. अशोक ज्ञानेश्वर ठोकळ यांनी एक एकर क्षेत्रावर बीएसएमआर ८५३ या नवीन वाणाचे ठिबक सिंचनावर प्रात्यक्षिक घेतले. एक एकर क्षेत्रामध्ये त्यांना १० क्विंटल तुरीचे उत्पन्न मिळाले. तुरीला ४५०० रुपये भाव मिळाल्यामुळे एक एकर क्षेत्र मधून त्यांना ४५००० रुपये एकुण उत्पन्न मिळाले.

कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य
१. बीएसएमआर ८५३ वाणाचे बियाणे
२. गंधक
३. बीज प्रक्रिया साहित्य
४. पीक संरक्षणासाठी लागणारी कीटकनाशके
५. क्षेत्रभेटीद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



शेतकऱ्याचे नाव: मच्छिंद्र उत्तमराव ठेंगडे
पत्ता:- पळसवाडी, ता. खुलताबाद,
जि. औरंगाबाद
फोन नंबर:- ९४२१४०७१७१

औरंगाबाद जिल्ह्यात खरीप हंगामात कापसाचे पीक सुमारे ३८०००० हेक्टर क्षेत्रावर घेतले जाते. कापसाच्या दोन ओळीमध्ये कोरडवाहू क्षेत्रात चार फुटाचे अंतर असते त्यामुळे कापसात मूग, उडीद व सोयाबीन ही आंतरपिके घेण्याची शिफारस व.ना.म.कृ.वि. परभणी यांनी केलेले आहे हे तंत्रज्ञान शेतकऱ्याच्या शेतावर पोहोचवण्यासाठी एमजीएम कृषि विज्ञान केंद्रातर्फे सन २०१८-१९ मध्ये पळसवाडी या दत्तक गावात पथदर्शक प्रात्यक्षिके या कार्यक्रमांतर्गत कापूस व मुग अंतरपीक पद्धतीचे १२ प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात आली. या शेतकऱ्यांमधील श्री मच्छिंद्र उत्तमराव ठेंगडे हे अल्पभूधारक शेतकरी आहे. त्यांनी १ एकर कापुस पिकात मुगाच्या उत्कर्ष या वाणाची लागवड केली. यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे त्यांना १ एकर क्षेत्रातून कापसाचे २.५ क्विंटल व मुगाचे ९० किलो उत्पादन मिळाले. मुगाला ४००० रुपये प्रती क्विंटल भाव मिळाला त्यातून त्यांना ३६०० रुपये उत्पन्न मिळाले. या उत्पन्नातून त्यांनी कापसाच्या पिक संरक्षणाचा खर्च भागवला. या अनुभवातून त्यांनी २०१९-२० मध्ये २ एकर क्षेत्रावर ही पीकपद्धती अवलंबण्याचे ठरवले आहे.




## कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्य

१. मुगाचे बियाणे
२. प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



शेतकऱ्याचे नाव: दादासाहेब दौलतराव शिंदे
पत्ता: भिंदोन ता. जि. औरंगाबाद
फोन नं.: ९८२२५०४२०५

एमजीएम कृषि विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद या केंद्राच्या दत्तक गावातील शेतकरी श्री. दादासाहेब शिंदे हे साखर कारखान्यातील मोठ्या पदावरची नोकरी सोडून शेतीकडे वळले. एमजीएम कृषि विज्ञान मंडळ अंतर्गत होणाऱ्या दर महिन्याच्या २१ तारखेच्या कार्यक्रमात ते आवर्जून हजर असतात. त्यांच्याकडे १६ एकर शेती असुन ९ एकरात डाळिंबाच्या भागव्या वाणाची लागवड केली आहे. फळबाग जगवण्यासाठी १.५ एकराचे शेततळे केले आहे त्यामध्ये २ कोटी लिटर आणि २ कोटी ४० लाख लिटर असी दोन शेततळी केली आहेत. शेततळ्यातील पाणी विहिरीत आणून ते फिल्टर करून फळबागेला दिले जाते. सुरुवातीला ५ एकर डाळिंब लावले. बागेच्या बांधावर शाहाळ्याच्या नारळाची ४०० झाडे वाढवली आहेत. या नारळाला तीसऱ्या वर्षापासून फळ येणे सुरू झाले. आणखी दोन वर्षांनी नारळाचे एक झाड किमान १०० ते १२५ फळे देईल. जागेवर १० रुपयाला एक नारळ जरी गृहीत धरले तरी नारळाचे एक झाड १००० ते १२०० रुपयाचे उत्पन्न देईल. ते डाळिंबासोबतच नारळालापण ठिबकने पाणी देतात. सन २०१९-२० मध्ये त्यांनी पुन्हा ४ एकर डाळिंब लागवड केली असून त्यांच्या बांधावरही २०० ते २५० नारळाची रोपे लावणार आहेत. त्यांच्याकडून माहिती घेऊन जिल्ह्यातील अन्य शेतकऱ्यांनीदेखील या नारळाची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या डाळिंबाच्या बागेत सर्वाधिक म्हणजे ७०० ग्रॅम वजनाचे डाळिंब भरले आहेत. त्यांनी ३.५ एकरात सीताफळ लागवडीचे नियोजन केले आहे.



# यशोगाथा

शेतकऱ्याचे नाव : दिपक पांडुरंग चव्हाण
पत्ता: सुलतानपूर ता. खुलताबाद
जि. औरंगाबाद
संपर्क क्र.: ९४२१३०५५५५



सुलतानपूर येथील श्री दिपक चव्हाण यांची एकत्रित कुटुंबाची ५२ एकर जमीन आहे. दिपक यांनी रसायनशात्रात पदव्युत्तर शिक्षण घेऊन २००७ ते २००९ या काळात एका खाजगी कंपनीत रसायनशास्त्रज्ञ म्हणून काम केले, परंतु त्यांना शेतीमध्ये आवड असल्यामुळे त्यांनी नोकरी सोडून शेतीमध्ये सुधारणा करायचे ठरवले.पावसाचे कमी होणारे प्रमाण लक्ष्यात घेऊन त्यांनी विहीर पुनर्भरण केले तसेच संपूर्ण शेताची बांधबंदिस्ती करून घेतली. पावसाच्या खंड काळात संरक्षित पाणी देण्यासाठी २ कोटी लिटरचे शेततळे केले. त्यांनी टप्या टप्यानी सर्व क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणले.

या भागातील महत्त्वाचे पीक म्हणजे आद्रक व मका. आद्रक पिकाचा अभ्यास करून त्यांनी खोडवा आद्रकीचे एकरी २५० टन विक्रमी उत्पादन काढले, तसेच मातीपरिक्षानानुसार खत व्यवस्थापन करून मका पिकाचे हेक्टरी १२५ क्विंटल उत्पन्न घेतले आहे. मजुरांवरील खर्च कमी करण्यासाठी शेतीमध्ये ट्रॅक्टरच्या साह्याने मशागतीचे जास्तीत जास्त कामे करतात. वातावरण बदलामुळे संरक्षित शेती करण्यासाठी ०.४० हेक्टर क्षेत्रावर शेडनेटची उभारणी केली आहे त्यामध्ये त्यांनी शिमला मिरची व काकडीचे भरघोस उत्पन्न घेतले आहे.

शेतीमध्ये प्रगती करत असताना इतर शेतकऱ्यांनाही मदत व्हावी म्हणुन त्यांनी २५७ सभासद असलेली ''स्वरूप शेतकरी उत्पादक कंपनी'' ची स्थापना केलेली आहे या कंपनी मार्फत आजूबाजूच्या शेतकऱ्याच्या मालाची प्रतवारी करून दिली जाते. जनावरांना हिरवा चारा मिळावा म्हणून सुरवातीला त्यांनी मुरघास स्वतःसाठी तयार केला व आता आधुनिक पद्धतीचे मशीन घेऊन कंपनीमार्फत शेतकऱ्याना मुरघास तयार करून देत आहेत. श्री. दिपक चव्हाण या प्रगतीचे श्रेय प्रगतीशील शेतकरी, कृषि विभाग व कृषि विज्ञान केंद्राला देतात.

महात्मा गांधी मिशन
कृषि विज्ञान केंद्र
(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा



नाव : सौ.नंदा शिवाजी ठोंबरे
बचत गटाचे नाव: शांतिगिरी महिला बचत गट
पत्ता – जामगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद
शिक्षण – ८ वी | मो. – ९४२०९२५२४४
शेती – १.५ एकर

महात्मा गांधी मिशन कृषि विज्ञान केंद्र, औरंगाबाद–२ येथे एप्रिल २०१८ मध्ये महिलांकरिता डाळ प्रक्रिया उद्योग याविषयी प्रशिक्षण घेतले होते. सौ.नंदाताईनी या प्रशिक्षणात सहभाग घेऊन विविध प्रकारच्या डाळ मिल, डाळ तयार करण्याची पद्धत व त्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर दुसऱ्या महिन्यातच नंदा ताईनी बचत गटामधून अंतर्गत कर्ज घेऊन रु.११०००/– ची छोटी डाळ मिल विकत घेऊन या उद्योगाचा पाया रवला. या दालमिलला त्यांनी खारीक–खोबरे बारीक करण्याच्या गिरणीची, उपवासाचे पदार्थ बारीक करण्याची गिरणी तसेच मसाले तयार करण्याची गिरणी याची जोड दिली. त्यांनी फक्त एका हंगामामध्ये १५ क्विं. तूर, १० क्विं. हरभरा व मुगाची डाळ तयारी केली. वर्षभरात त्यांना या उद्योगापासून रु.२०,०००/– उत्पन्न मिळाले.

नंदाताईच्या या उद्योगात त्यांच्या पतीची देखील साथ मिळाली. त्यांचे शिक्षण फक्त आठवी परंतु त्यांची चिकाटी, मेहनत व या वयात देखील शिकण्याची आवड यामुळे त्या आपल्या पायावर उभ्या राहू शकल्या. महात्मा गांधी मिशन कृषि विज्ञान केंद्र, औरंगाबाद–२ च्या तांत्रिक मार्गदर्शनाने आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या आर्थिक सहाय्याने त्यांनी आपली यशस्वी वाटचाल चालू केली. त्यांचे हे कार्य खरोखरच प्रेरणादायी ठरेल.

भाकृअनुप ICAR

महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

MAHATMA GANDHI MISSION

# यशोगाथा



नाव : सौ. जयश्री मधुकर देगावे
पत्ता – गारखेडा परीसर, जि.औरंगाबाद
शिक्षण – एम.ए.
संपर्क क्र. – ९३०९५९२५५०

**सौ. जयश्रीताई या गृहिणी आहेत. इंस्टंट ढोकळा, इडली, डोसा तसेच शिकाकाई पावडर, आवळा पावडर असे विविध गोष्टी त्या घरगुती पद्धतीने तयार करून विक्री करत होत्या. परंतु या मध्ये त्यांना हवे तशे यश मिळत नसल्याने त्यांनी एमजीएम कृषी विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद–२ येथे संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी २०१७ मध्ये एमजीएम केव्हीकेने आयोजित दोन दिवशीय नैसर्गिक वस्तू म्हणजे हळद, बीट, पळसाची फुले, नीळ पावडर, खायचे रंग, मेहंदी यापासून विविध होळीचे नैसर्गिक रंग बनविण्याचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर एमजीएम केव्हीके च्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली पहिल्या वर्षी ३० किलो नैसर्गिक रंग तयार करून रु.३००/–प्रती किलो याप्रमाणे त्याची विक्री केली. त्यातून त्यांना रु.९०००/– मिळाले. त्यांना हे रंग तयार करण्यासाठी रु.१५७०/– खर्च झाला आणि रंग विक्रीतून रु.६४३० निव्वळ नफा झाला. दुसऱ्या वर्षी त्यांनी ८० किलो नैसर्गिक रंग तयार केले. त्यातून त्यांना रु.२४०००/– मिळाले. त्याची प्रत्यक्ष मार्केटिंग करून विक्री केली त्यातून त्यांना रु. ४४००/– खर्च लागला आणि रंग विक्रीतून रु.१९६००/– निव्वळ नफा झाला. आज औरंगाबाद शहरात त्यांनी स्वतःची एक महिला उद्योजक म्हणून ओळख निर्माण केली.**



महात्मा गांधी मिशन

# कृषि विज्ञान केंद्र

(भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली) गांधेली, ता. जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

# यशोगाथा

नाव - श्री. जिजाभाऊ चंदू चव्हाण
पत्ता - भिंदोन तांडा, ता.जि.औरंगाबाद
शिक्षण - अशिक्षित
शेती - ५.५ एकर
संपर्क क्र. - ८०५५५५५७६९



मी श्री.जिजाभाऊ चंदू चव्हाण भिंदोन तांड्याचा रहिवाशी आहे. माझ्याकडे ५.५ एकर शेती आहे. शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे मी शेतीला दुग्धव्यवसायाची जोड दिली. माझ्या कुटुंबामध्ये ४ सदस्य आहेत. मी सुरवातीला स्वयंपाकासाठी LPG गॅस चा तर पाणी तापवण्याकरिता जळतनाचा व गवऱ्याचा वापर करत असे. पण मी सन २०१७-१८ मध्ये एमजीएम कृषी विज्ञान केंद्र, गांधेली, औरंगाबाद-२ यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाने व राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती मार्फत बायोगॅसचे सयंत्र सुरु केले. त्यामुळे शेणाचा योग्य उपयोग होऊन मला ५ ते ६ क्विं. स्लरीच्या माध्यमातून खत मिळाले. आता दोन्ही वेळेचा स्वयंपाक करण्यासाठी याच गॅसचा वापर करण्यात येतो, याशिवाय पाणी तापवण्यासाठी देखील याचाच वापर होतो. त्यामुळे माझा LPG गॅस, जळतनाचा व गवऱ्याचा वापर बंद झाला असून वर्षाच्या शेवटी माझी रु. १0000/- ची बचत होते. त्याशिवाय धुरामुळे माझ्या पत्नीला डोळ्यामध्ये जळजळ होणे, श्वास घेण्यास त्रास होणे असा त्रास होत होता परंतु आता तिला गोबर गॅसच्या वापरामुळे याप्रकारचा कोणता त्रास होत नाही. स्लरीचा वापर शेतामध्ये केल्यामुळे माझा खतावरील खर्च कमी झाला आहे, जमिनीचा पोत देखील सुधारून उत्पनात देखील वाढ होत आहे.

